| | पोलीस आयुक्तालय नवी मुंबई<br><br>प्रेसनोट | 2025<br><br>CB/22/2025 |
|---|---|---|
| गुन्हे शाखा, नवी मुंबई | | दिनांक १८.०४.२०२५ |

**नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील हरवलेल्या महिला व बालकांसाठी ‘‘ऑपरेशन शोध ’’मोहीम राबविणेबाबत.**

.........................................................................................................................................

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी महाराष्ट्र राज्यातील हरवलेल्या महिला व बालकांच्या संदर्भात विशेषत: १ वर्ष उलटुन गेलेल्या महिलांच्या प्रकरणी गांभीर्याने लक्ष घालुन महिला व बालकांचा शोध घेण्यासाठी ‘‘ ऑपरेशन शोध ’’ हि विशेष मोहिम दिनांक १७/०४/२०२५ ते दिनांक १५/०५/२०२५ या कालावधीत आयुक्त स्तरावर राबविण्याबाबत आदेशीत केले आहे.

त्यानुसार नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील एका वर्षा पेक्षा जास्त कालावधी पासुन मिळुन न आलेल्या महिला, बालकांचा शोध घेण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय स्तरावर ‘‘ऑपरेशन शोध’’ साठी पोलीस ठाणे स्तरावर एकूण २० पथके व गुन्हे शाखेतील अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडील २ पथके तयार करण्यात आली आहेत.

‘‘ ऑपरेशन शोध ’’ मोहिमेअंर्तगत हरवलेल्या महिला व बालकांचा शोध घेण्यासाठी
१) मा.बाल कल्याण समिती, कर्जत, ठाणे, उल्हासनगर,
२) मा. अधीक्षक, बाल निरीक्षण गृह, रायगड, ठाणे,
३)तसेच नवी मुंबई आयुक्तालयातील विविध एनजीओ यांच्याशी समन्वय साधुन शोध मोहिम राबविण्यात येणार आहे.

नवी मुंबईतील हरवलेल्या महिला व बालकांबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास नागरीकांनी १०३ या हेल्पलाईन वर माहिती देण्याचे नवी मुंबई पोलीसांकडुन आवाहन करण्यात येत आहे.

★★★★★★★★★★